पुढारी

# लेखणीतून समाजाला दिशा द्या

## आयुक्त डॉ. कलशेट्टी; मुक्त विद्यापीठ पत्रकारिता अभ्यासक्रमांचा प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पत्रकारितेच्या क्षेत्रात करिअरच्या असंख्य संधी आहेत. या क्षेत्रात आल्यानंतर पत्रकार म्हणून मोठी भूमिका पार पाडावी लागणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या लेखणीतून समाजाला चांगली दिशा देण्याचे काम करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामार्फत पत्रकार ग. गो. जाधव चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने गेल्या १७ वर्षांपासून सुरू असलेल्या पत्रकारितेच्या पदविका व पदवी अभ्यासक्रमाचा शैक्षणिक सत्राचा प्रारंभ रविवारी झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहाजी लॉ कॉलेजच्या प्रा. ॲड. मेघा ठोंबरे होत्या. शहाजी लॉ कॉलेजमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला दै. 'पुढारी'चे सहायक सरव्यवस्थापक (ॲडमिन) व केंद्रप्रमुख राजेंद्र मांडवकर, शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. शिवाजी जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.




**कोल्हापूर : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी. सोबत केंद्रप्रमुख राजेद्र मांडवकर व प्रा. ॲड. मेघा ठोंबरे. (छाया : नाज ट्रेनर)**

दै. 'पुढारी'चे संस्थापक-संपादक पद्मश्री डॉ. कै. ग. गो. जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन कार्यक्रमाला सुरुवात झाली.

आयुक्त कलशेट्टी म्हणाले, पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी 'पुढारी'च्या अनुभवाची शिदोरी असणार आहे. सकारात्मक विचार करणारे हे क्षेत्र असून विद्यार्थ्यांनी समाजाचे प्रश्न, समस्या लेखणीतून मांडावे. नियमित वर्ग व मन लावून अभ्यास केल्यास या क्षेत्रात नक्की यशस्वी व्हाल, असेही डॉ. कलशेट्टी म्हणाले.

मांडवकर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या भरघोस प्रतिसादामुळे मुक्त विद्यापीठाकडून या केंद्राला अव्वल दर्जाची मान्यता मिळाली आहे. वर्तनमानपत्राद्वारे चालविले जाणारे हे महाराष्ट्रातील एकमेव पत्रकारिता अभ्यासकेंद्र आहे. या केंद्रातून आजपर्यंत तीन हजार विद्यार्थ्यांनी पदविका व पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. डॉ. जाधव यांनी 'आजची पत्रकारिता' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ॲड. ठोंबरे यांनी अभ्यासक्रमाची माहिती दिली.

विक्रम रेपे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी केंद्र संयोजक मारुती पाटील, ग्रंथपाल ज्ञानेश्वर कुलकर्णी, केंद्र सहायक ॲड. सविता सागर, ॲड. रेहाना सिदनाळे, अनुजा माने यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. प्रशांत जाधव यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 SEP 2019
सकाळ

# 'रसायनशास्त्र' नव्या जागेत

## शिवाजी विद्यापीठात तीन इमारतींचे उद्‌घाटन; मुले-मुलींचे स्वतंत्र वसतिगृह

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १५ : शिवाजी विद्यापीठात नव्याने बांधण्यात आलेल्या तीन इमारतींचे उद्‌घाटन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या नूतन संशोधक विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीचे उद्‌घाटन करताना मंत्री चंद्रकांत पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागासाठी नूतन विस्तारित इमारत बांधली आहे. त्याचप्रमाणे 'कमवा व शिका' योजनेंतर्गत मुलींच्या वसतिगृहाची इमारत आणि संशोधक विद्यार्थी वसतिगृहासाठी इमारत अशा एकूण तीन इमारती बांधल्या आहेत.

रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे पहिल्या टप्प्यातील बांधकाम पूर्ण झाले आहे. यांतर्गत तळमजल्याचे ८१६.२९ चौरस मीटर क्षेत्रफळाइतके बांधकाम पूर्ण झाले आहे. संशोधक विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीचे तळघर अधिक तळमजला, असे बांधकाम विद्यापीठाच्या स्वनिधीमधून केले आहे. एकूण १२९१.०२ चौरस मीटर इतके बांधकाम झाले आहे. या ठिकाणी एकूण १०० संशोधक विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था होणार आहे.

त्याचप्रमाणे 'कमवा व शिका' योजनेंतर्गत तीन मजली इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले असून, तळमजला विद्यापीठाच्या स्वनिधीतून; तर वरील दोन मजले 'राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियाना'च्या (रुसा) अनुदानातून बांधण्यात आले आहेत. १३७१ चौरस मीटर क्षेत्रफळ आहे. येथे सुमारे १५० विद्यार्थिनींची निवास व्यवस्था आहे. सर्व इमारतींचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

इमारतींचा कोनशिला अनावरण आणि इमारतींमध्ये फीत कापून प्रवेश करून गुरुवारी (ता. १२) हे उद्‌घाटन झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. टी. गायकवाड, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, राहुल चिकोडे, अमित कुलकर्णी आदी उपस्थित होते.